**महाराष्ट्र शासन**

क्रमांकः- आप्रयो ४४१९/ प्र. क्र. १९/ आस्था (अतांत्रिक)
जलसंपदा विभाग,
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ३० मे, २०१९.

ईमेल:- dsestt.wrd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्रमांक:- ०२२-२२०२५२०४

अधीक्षक अभियंता
पुणे पाटबंधारे मंडळ,
आ.क्र.
उप. अ.अ.
स.अ.अ.
अधीक्षक
प्रथम लिपिक
शाखा
आवक क्र.
13 JUN 2019

प्रति,
सर्व अधीक्षक अभियंता,
जलसंपदा विभाग.

**विषय:- गोपनीय अहवाल उपलब्ध न होणाऱ्या अथवा गहाळ झालेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत.**

आश्वासित प्रगती योजनेच्या धोरणानुसार वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचे लाभ अनुज्ञेय होण्याकरीता पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या कार्यपद्धतीची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालांच्या प्रतवारीसंबंधातील अटींची देखील पूर्तता होणे आवश्यक आहे.

२. तथापि, काही कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल त्यांच्या संबंधित कार्यालयांच्या अभिलेख्यांवर उपलब्ध होत नाहीत अथवा गहाळ होतात. अशा प्रकरणी कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय करण्यात यावे किंवा कसे याबाबत शासनाकडे मार्गदर्शनपर प्रस्ताव सादर करण्यात येतात.

३. उपरोक्त परिस्थितीच्या अनुषंगाने आपले लक्ष शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १ नोव्हेंबर, २०११ अन्वये देण्यात आलेल्या सूचना व त्यानंतर त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांकडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणे या संदर्भातील कार्यवाही संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.

४. तथापि, एखाद्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल अंतर्भूत असलेली नस्ती आढळून येत नसल्यास/ गहाळ झाल्यास कोणती कार्यवाही करावी याबाबत काही विवक्षित नियम/ आदेश नसल्याने मंत्रालयाच्या आगीत नष्ट झालेल्या गोपनीय अहवालांची पुनर्बांधणी करण्याबाबतच्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १९ जुलै, २०१२ अन्वये दिलेल्या सूचनांस अनुलक्षून खालील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना आपणांस देण्याचे मला निदेश आहेत:-

(१) उक्त शासन निर्णयातील अनुक्रमांक १ ते ७ नुसार कागदपत्रे उपलब्ध झाल्यास नमुना १ नुसार व अनुक्रमांक १ ते ७ नुसार प्रयत्न करुन देखील ज्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षातील गोपनीय अहवालांबाबत कोणतीही नोंद उपलब्ध होणार नाही, अशा प्रकरणी सदर शासन निर्णयासोबतच्या नमुना २ नुसार प्रमाणपत्र तयार करुन ते गोपनीय अहवाल नस्तीमध्ये अंतर्भूत करावयाचे आहे.

(२) सदर शासन निर्णयात "सर्वसाधारणपणे विविध प्रकारच्या पदोन्नत्या, पुनर्विलोकन व अन्य मुल्यमापन या प्रयोजनासाठी किमान ५ व जास्तीत जास्त १० वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेतले जातात, ही बाब विचारात घेऊन सन २०११-१२ पासून मागे किमान १० वर्षांचे गोपनीय अहवाल उपलब्ध होतील तेथपर्यंतच पुनर्बांधणी करण्यात यावी" असे नमूद केलेले आहे. मात्र या तरतुदीनुसार आवश्यकता असल्यास तत्पूर्वीच्या गोपनीय अहवालांची पुनर्बांधणी करण्यास देखील कोणताही प्रत्यवाय नाही.

(३) शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचा गोपनीय अभिलेख हा महत्वाचा दस्तावेज असल्याने तो अधिकारी/ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतरही सद अभिलेख ५ वर्षांपर्यंत जतन करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे.

(४) जर काही अपरिहार्य कारणामुळे गोपनीय अहवाल अभिलेख्यांवर उपलब्ध झाले नाहीत तर, सदर सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाची सामान्य प्रशासन विभागास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १९ जुलै, २०१२ नुसार पुनर्बांधणी करण्यात यावी.

५. सदर पत्र सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४६/ २०१९/ कार्यासन १३, दिनांक ७ मे, २०१९ अन्वये प्राप्त झालेल्या अभिप्रायांस/ सूचनांस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

(कि. शां. परब)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,
२. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
३. अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर यांना त्यांचे पत्र क्रमांक भीकामं/ पशा/ आ-२/ २११/ २०१९ दिनांक १० जानेवारी, २०१९ यास अनुलक्षून उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत माहितीसाठी अग्रेषित,

१. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई. (कार्यासन-१३)
२. प्रधान सचिव (वि.सु.) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. (सेवा-३)
३. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, प्रकल्प समन्वय, जलसंपदा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. कक्ष अधिकारी, आस्था (तांत्रिक), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

आस्था (अतांत्रिक) संग्रहार्थ.